दि. 12 अक्टोंबर 2019 शनिवार दैनिक विष्णुपुरी एक्सप्रेस 12/10/19

# वाटमारी करणारी टोळी जेरबंद, स्थागुशाची कारवाई

## ३ खंजर, २ मोटारसायकल, १० मोबाईल सह २ लाखांचा मुद्देमाल जप्त

नांदेड (प्रतिनिधी) : नांदेड शहरासह जिल्हात वाटमारी करुन हैदोस घालणारी टोळी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने बळीरामपूर येथून दि. १० रोजी दरोडयाच्या तयारीत असतांना सापळा रचून जेरबंद करुन ३ खंजर, २ मोटारसायकल, १० मोबाईलसह ०२ लाख १५ हजार ८६० रुपयाचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला.

नांदेड शहर व जिल्हात मागील काही दिवसापासून चोरी व दरोडयाच्या घटना घडत आहेत. त्यामुळे दरोडयाची टोळी सक्रीय असल्याची चुनूक पोलिसांना लागली होती. दि. १० रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे सहायक पोलिस निरीक्षक पी.डी. भारती हे आपल्या पथकासह नाईट पेट्रोलिंग करीत असतांना बळीरामपूर येथे काही संशयीत लोक दबा धरुण बसले असल्याची माहिती मिळाली. पोलिस अधिक्षक विजयकुमार मगर, अप्पर पोलिस अधिक्षक दत्तराम राठोड, उपविभागीय पोलिस अधिकारी धनंजय पाटील, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक शिवाजी डोईफोडे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनी पी. डी. भारती यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि पी. डी. भारती यांच्या पथकातील महेश कुलकर्णी, हनमंतु पोतदार, मोतीराम पवार, राजु पल्लेवार, बजरंग बोडके, गजानन बयनवाड, हिंगनकर, टेकाळे शंकर केंद्रे यांनी १० रोजी मध्यरात्री खब-यानी माहिती दिलेल्या ठिकाणी बळीरामपुर येथे जावून छापा टाकून दबा धरुन बसलेल्या ५ जणांना ताब्यात घेतले. यावेळी त्यांच्याकडून चोरीच्या गुन्हातील मोबाईल, ०३ खंजर, नायलॉन दोरी, २ मोटारसायकल असे साहित्य आढळुन आले. त्यांची चौकशी केली असता नांदेड शहरतील विविध ठाण्याच्या हद्दित नागरिकांना मारहाण करुन अनेकांना लुटल्याचे त्यांनी सांगितले असून या पाचही जणा विरुध्द विविध ठाण्यात रोड, रॉबरी, दरोडयाचे गुन्हे दाखल आहेत. या प्रकरणी ५ जणा विरुध्द ग्रामीण ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. स्थानिक गुन्हे शाखेच्या या कामगिरी बदल पोलिस अधिक्षक विजयकुमार मगर, अप्पर पोलिस अधिक्षक दत्तराम राठोड यांच्यासह आदी पोलिस अधिका-यांनी स्थागुशाच्या पथकाचे कौतुक केले आहे.